नियमीत दिवाणी दावा क्र.०७/२०१९
अनुसया वि. शासन व इतर
वादीतर्फे सा.क्र.६  (नि.क्र.९४)

**उर्वरीत उलटतपास प्रतिवादी क्र.५ तर्फे श्री.डी.एल.घोगरे वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

**१३.** तथाकथीत वाटणीपत्रावर दि.२४/११/२०२१ रोजी सहया झाल्यावर दि.२५/११/२०२१ रोजी नोटरी ऑफीसला जावून त्यावर शिक्के घेण्यात आले. मी सांगतो की, ऑफीसला सगळेजण हजर होते. जनाबाई, तिची दोन मुले, अनुसयाबाई व तिची दोन मुले, मोघे गुरुजी आणि मी असे नोटरी कार्यालयात हजर होतो. २५ तारखेला नोटरी यांनी त्यांच्यासमक्ष आमच्या सहया घेतल्या. सहयांच्या खाली तारीख नमूद करण्यात आली. मला आता दस्त नि.क्र.९९ दाखवला त्यावर दि.२५/११/२०२१ रोजी नोटरीने सहया घेतल्याबद्दल व तारीख घातल्याबद्दल त्यात उल्लेख नाही. हे खरे नाही की, नोटरीसमक्ष कोणी पक्षकार गेले नाहीत किंवा त्यांनी तेथे सहया केल्या नाहीत. जनाबाई व तिच्या मुलांना फसवुन दि.२४/११/२०२१ रोजी त्यांच्या सहया दस्तावर घेण्यात आल्या, हे म्हणणे खरे नाही. हे खरे नाही की, दोन एकर जमीन आम्हाला द्या व उर्वरीत जमीन, पेन्शन तुम्हाला ठेवा असे म्हणून दि.२४/११/२०२१ रोजी वादींनी प्रतिवादींच्या या दस्तावर प्रलोभन दाखवून सहया घेतल्या. हे खरे नाही की, तो दस्त त्यांना वाचून दाखवला नव्हता. हे खरे नाही की, जनाबाई व तिच्या मुलांच्या कारस्थानात मी सहभागी झालो आणि हा दस्त केला. हे खरे नाही की, प्रतिवादी व त्यांच्या मुलांना धोका देवून या सहया घेण्यात आल्या. हा दस्त फसवून करुन घेतला असल्याबद्दल प्रतिवादीने वादी, तिची मुले आणि माझ्याविरुध्द फसवणुकीचा फौजदारी खटला दाखल केला आहे, हे खरे नाही. अहमदपूर न्यायालयात हा खटला प्रलंबित आहे, याबद्दल मला माहिती नाही. हे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील मजकुर खोटा आहे. हे खरे

नाही की, नि.क्र.९९ चा दस्त माझ्या समक्ष झाल्याचे आणि प्रतिवादी व तिच्या मुलांनी तो लिहून दिल्याचे मी खोटे सांगतो. हे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

**स्वाक्षरीत/-**
(एस.एन.सरडे)

दिनांक ०८/०७/२०२५.

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.